**"प्रसिद्धीपत्रक"**

मा.आयुक्त(शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.आस्था-क/ प्राथ१०६/ पदभरती/ /२०२४/१४०८ दिनांक-२५/०२/२०२४ नुसार पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक भरती प्रक्रियेतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माध्यमिक शिक्षण विभागासाठी पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करून संबंधित उमेदवारांना पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करणेबाबत आदेश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागासाठी दुसऱ्या फेरीसाठी पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी **दिनांक २४/०७/२०२४ रोजी माध्यमिक शिक्षण विभाग दुसरा मजला मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११०१८** या ठिकाणी पूर्ण करण्यात येईल. पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षण सेवक भरती प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागासाठी पात्र ठरलेल्या सर्व १० उमेदवारांनी पुढीलप्रमाणे **दिनांक २४/०७/२०२४** रोजी आपली पात्रता सिद्ध करणेसाठी सर्व मूळ कागदपत्रांसह **सकाळी १२.०० ते दुपारी ३.००** या वेळेत तपासणी कक्षात उपस्थित राहून कागदपत्रे पडताळणी बाबत कार्यवाही पूर्ण करून घ्यावयाची आहे. संबंधित पात्र उमेदवार पडताळणीसाठी उपस्थित न राहिल्यास संबंधित उमेदवाराची अनुपस्थिती राज्य स्तरावर कळविण्यात येईल व शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. उमेदवारांच्या अनुपस्थिती बाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याची नोंद घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८

सोबत :

१. कागदपत्रे पडताळणी सूची
२. सर्वसाधारण गुणवत्ता यादी.

टीप : पात्र उमेदवारांनी पुढीलप्रमाणे मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी उपलब्ध करून द्यावी तसेच ऑनलाईन अर्जाची प्रत, स्व प्रमाणपत्र व शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व इतर आवश्यक कागदपत्रांचा झेरॉक्स संच आपल्या पासपोर्ट साईज फोटोसह सादर करणे आवश्यक राहील.

क्र.माध्य/शि/०१/कावि/५०२/२०२४
दि.२२/०७/२०२४

| Sr. No. | TAIT Roll No. | Marks Obtained | Candidate Name | Subject |
|---|---|---|---|---|
| 1 | 2310008011 | 129 | SACHIN DHANAJI SALGAR | Language (English) |
| 2 | 1410018806 | 125 | PURUSHOTTAM DEVIDAS NIKUMBH | Language (English) |
| 3 | 3010010229 | 124 | DILIP ASHOK JADHAV | Language (English) |
| 4 | 2310007090 | 123 | ATUL KESHAV BURTUKANE | Language (English) |
| 5 | 3410003575 | 123 | PRIYANKA ROHIT INGALE | Language (English) |
| 6 | 3410001986 | 123 | SANDIP SURYAKANTAPPA KALYANKAR | Language (English) |
| 7 | 1110000321 | 122 | KALPANA PRAKASH SADAPHAL | Language (English) |
| 8 | 2810003308 | 121 | ANURADHA PARMESHWAR DESHMANE | Language (English) |
| 9 | 2310007987 | 121 | SAGAR MADHUKAR KAMBLE | Language (English) |
| 10 | 3010006799 | 110 | DEVANAND PUNDALIK RAUT | Language (English) |

पडताळणी सूची

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| | **शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता कागदपत्रे (१२/०२/२०२३ पूर्वीचे)** |
| १. | पवित्र प्रणाली अंतर्गत नोंद केलेल्या स्व प्रमाणपत्राची प्रत |
| २. | शालांत परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ३. | उच्च माध्यमिक परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ४. | पदवी परीक्षा गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्र |
| ५. | शिक्षणशास्त्र पदवी गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ६. | शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/सीटीईटी) गुणपत्रक व प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ७. | शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२२ गुणपत्रक |
| ८. | अधिवास प्रमाणपत्र |
| ९. | जातीचा दाखला व प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १०. | जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ११. | समांतर आरक्षणातील लाभासाठी '४०% दिव्यांगत्व' असल्याचे प्रमाणपत्र |
| १२. | समांतर आरक्षणातील लाभासाठी 'माजी सैनिक' असल्याचे प्रमाणपत्र |
| १३. | समांतर आरक्षणातील लाभासाठी 'पदवीधर अंशकालीन' असल्याचे प्रमाणपत्र |
| १४. | समांतर आरक्षणातील लाभासाठी 'प्रकल्पग्रस्त' असल्याचे प्रमाणपत्र |
| १५. | समांतर आरक्षणातील लाभासाठी 'भूकंपग्रस्त' असल्याचे प्रमाणपत्र |
| १६. | समांतर आरक्षणातील लाभासाठी 'प्राविण्यप्राप्त खेळाडू' असल्याबाबतचे विभागीय क्रीडा उपसंचालक यांचा पडताळणी अहवाल अथवा पडताळणीसाठी प्रस्ताव दाखल केल्याची पोचपावती. |
| १७. | समांतर आरक्षणातील लाभासाठी 'अनाथ' असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १८. | आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १९. | उन्नत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| २०. | उमेदवाराच्या नावात बदल असल्यास त्याबाबतचा पुरावा |
| २१. | याव्यतिरिक्त अर्ज भरताना ऑनलाईन अपलोड केलेली इतर कागदपत्रे. |